No More जोर पेट सफा घ्या दररोज...
तर आजच घेऊन या पेट सफा आयुर्वेदिक ग्रॅन्युल्स तथा टॅबलेटस् ज्याला सेवन करणे अगदी सोपे, परिणाम पहिल्या दिवसापासून आणि याची सवयही लागत नाही.
Dr. Juneja's पेट सफा Natural Laxative Granules & Tablets
बद्धकोष्ठता • गॅस ॲसिडिटी
24x7 Helpline: 91197 88888 | www.petsaffa.com
Available at all medical & general stores

# १० खेळाडूंचा पत्ता कट

## इंग्लंडविरुद्धच्या एकदिवसीय मालिकेसाठी भारतीय संघात बदल

**मुंबई । वृत्तसंस्था**

टीम इंडियामध्ये मोठे फेरबदल झाले आहेत. टीम इंडियातून १० खेळाडूंचा पत्ता कट करण्यात आला आहे. त्या १० खेळाडूंच्या जागी ९ खेळाडूंना संधी देण्यात आली आहे. हा बदल आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफीसाठी नाही, तर इंग्लंडविरुद्धच्या एकदिवसीय मालिकेसाठी करण्यात आला आहे. टीम इंडियाने इंग्लंड विरुद्धची ५ सामन्यांची टी-२० मालिका ही ४-१ अशा फरकाने जिंकली. टीम इंडियात टी-२० मालिकेसाठी १५ खेळाडूंना संधी देण्यात आली होती, त्यापैकी १० खेळाडू हे एकदिवसीय मालिकेचा भाग नाही. वनडे सीरिजसाठी इतर ९ खेळाडूंचा टीम इंडियात समावेश करण्यात आला आहे. टीम इंडिया विरुद्ध इंग्लंड यांच्यातील एकदिवसीय मालिकेतील सलामीचा सामना हा ६ फेब्रुवारीला नागपूरमध्ये खेळवण्यात येणार आहे.



**१० खेळाडूंना बाहेरचा रस्ता!**

टीम इंडियातून संजू सॅमसन, अभिषेक शर्मा, तिलक वर्मा, सूर्यकुमार यादव, रवी बिश्नोई, वरुण चक्रवर्ती, शिवम दुबे, रमनदीप सिंह, रिंकु सिंह आणि ध्रुव जुरेल यांचा एकदिवसीय मालिकेसाठी समावेश करण्यात आलेला नाही. सूर्यकुमार, संजू सॅमसन, अभिषेक शर्मा, रवी बिश्नोई आण तिलक वर्मा हे खेळाडू टी-२० मालिकेतील पाचही सामन्यात प्लेइंग ईलेव्हनचा भाग होते. तर रिंकु सिंह पहिल्या ३ सामन्यांमध्ये खेळला. ध्रुव जुरेल आणि शिवम दुबे या दोघांना प्रत्येकी २-२ सामन्यात संधी मिळाली. तर रमनदीपला फक्त १ सामन्यात खेळायचे भाग्य लाभले.

**९ खेळाडूंना वन डे सीरिजसाठी संधी**

कर्णधार रोहित शर्मा, विराट कोहली, यशस्वी जयस्वाल, रवींद्र जडेजा, ऋषभ पंत, केएल राहुल, श्रेयस अय्यर, कुलदीप यादव आणि वरुण चक्रवर्ती यांचा समावेश आहे. कुलदीप ऑक्टोबर तर श्रेयस ऑगस्ट २०२४ नंतर वनडे मॅच खेळताना दिसणार आहेत.

### वन डे सीरिजसाठी टीम इंडिया

रोहित शर्मा (कर्णधार), शुबमन गिल (उपकर्णधार), यशस्वी जयस्वाल, विराट कोहली, श्रेयस अय्यर, केएल राहुल (यष्टीरक्षक), ऋषभ पंत (यष्टीरक्षक), हार्दिक. पंड्या, रवींद्र जडेजा, वॉशिंग्टन सुंदर, अक्षर पटेल, कुलदीप यादव, हर्षित राणा, मोहम्मद शमी, अर्शदीप सिंग, वरुण चक्रवर्ती.

### वन डे सीरिजसाठी इंग्लंड टीम

जोस बटलर (कॅप्टन), जोफ्रा आर्चर, गस ॲटकिन्सन, जेकब बेथेल, हॅरी ब्रूक, ब्रायडन कार्स, बेन डकेट, जेमी ओव्हरटन, लियाम लिव्हिंगस्टोन, आदिल रशीद, जो रूट, साकिब महमूद, फिल सॉल्ट आणि मार्क वुड.

# वरुण चक्रवर्तीची टीम इंडियाच्या वन डे संघात एन्ट्री!

**नागपूर । वृत्तसंस्था**

भारत आणि इंग्लंड यांच्यात तीन सामन्यांची वनडे मालिका ६ फेब्रुवारीपासून सुरु होणार आहे. भारताने इंग्लंडला टी२० मालिकेत लोळवल्याने इंग्रजांचे मनोबळ खचले आहे. त्यामुळे कमबॅक करण्यासाठी त्यांची धडपड असणार आहे. असे असताना इंग्लंड संघाला घाम फुटला आहे. कारण संघाचा भाग नसताना अचानक वरुण चक्रवर्ती टीम इंडियासोबत नागपूरला पोहोचला आहे. वरुण चक्रवर्तीने टी-२० मालिकेत इंग्लंडचे कंबरडे मोडले होते. पाच सामन्यात १४ विकेट घेत प्लेयर ऑफ द सिरीजचा मान पटकावला होता. त्याच्या या खेळीची दखल घेतली असे दिसत आहे. वरुण चक्रवर्ती चॅम्पियन्स ट्रॉफीत खेळण्याची शक्यता यावरून वर्तवण्यात येत आहेत. वरुण चक्रवर्ती टीम इंडियासोबत सराव करत असल्याने काही संकेत मिळत आहेत. चॅम्पियन्स ट्रॉफी संघात ऐनवेळी वरुण चक्रवर्तीची संघात एन्ट्री झाली तर आश्चर्य वाटायला नको. वरुण चक्रवर्ती टीम इंडियासह नेट प्रॅक्टिस करताना दिसला. नागपूरच्या प्रॅक्टिस पिचवर केएल राहुलला गोलंदाजी करताना दिसला. त्याच्या टीम इंडियाच्या सर्व खेळाडूंची नजर होती.



वरुण चक्रवर्तीने अद्याप वनडे क्रिकेटमध्ये डेब्यू केलेले नाही. पण त्याने टी-२० मालिकेत केलेली कामगिरी नाकारता येणार नाही. वरुण चक्रवर्ती टीम इंडियाचा सध्या तरी भाग नाही. पण लवकरच त्याचा समावेश संघात होऊ शकतो अशी चर्चा क्रीडाप्रेमींमध्ये रंगली आहे. विजय हजारे ट्रॉफीतही वरुण चक्रवर्तीने चांगली कामगिरी केली होती. वरुण चक्रवर्तीने तामिळनाडूसाठी एकूण ६ सामने खेळले आणि १८ विकेट घेतल्या. त्याचा इकोनॉमी रेट हा ५ रन प्रतिओव्हर होता. इतकंच काय दोन वेळा पाच विकेट घेण्यात यशस्वी ठरला. लिस्ट ए २३ सामन्यात वरुण चक्रवर्तीने ५९ विकेट घेतल्या.

## मुंबईच्या सान्वी देशवालचा जलतरणात सुवर्ण धमाका

### ३८व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत २०० मीटर्स शर्यतीत केला पराक्रम

**डेहरादून । वृत्तसंस्था ।**

सान्वी देशवाल हिने वैयक्तिक मिडले प्रकारात वर्चस्व प्रस्थापित करताना ३८व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेच्या २०० मीटर्स शर्यतीत सोनेरी कामगिरी केली. या आधी तिने याच स्पर्धेमध्ये ४०० मीटर्स वैयक्तिक मिडले प्रकारात सुवर्ण जिंकले होते.



श्वेता गुजाळ हिने ३८व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत महिलांच्या ट्रॅक सायकलिंगमध्ये इलिट स्प्रिंट टू लॅप्स प्रकारात सुवर्ण जिंकले. सान्वीने दोनशे मीटर्स शर्यत दोन मिनिटे २४.९० सेकंदांत पार केली. अदिती हेगडेने ४०० मीटर्स फ्री स्टाईल शर्यतीत कांस्य आणि ऋतुजा राजाज्ञ, तसेच ऋषभ दास याने कांस्य पदकाची कमाई केली. एक मीटर स्प्रिंग बोर्ड डायव्हिंग प्रकारात क्षमा बंगेराने कांस्य जिंकले. राहुल बैठा व अंजली सेमवाल यांनी महाराष्ट्राला स्क्वॉशमध्ये उपविजेतेपद मिळवून दिले.



## विराट कोहली इतिहास घडवण्यासाठी सज्ज

### सचिनचा महारेकॉर्ड धोक्यात

**नागपूर । वृत्तसंस्था**

टीम इंडियाचा अनुभवी फलंदाज आणि माजी कर्णधार विराट कोहली याला गेल्या काही महिन्यांपासून सातत्याने धावांसाठी संघर्ष करावा लागत आहे. विराटने ऑस्ट्रेलिया दौऱ्यातील पर्थ कसोटीत खणखणीत शतक झळकावत अफलातून सुरुवात केली होती. मात्र विराटला त्याच्या या कामगिरीत सातत्य राखता आले नाही. विराटला बॉर्डर गावसकर ट्रॉफीत धावांसाठी संघर्ष करावा लागला. विराटने त्यानंतर अनेक वर्षांनी देशांतर्गत क्रिकेटमध्ये कमबॅक केले. विराट इथेतरी मोठी खेळी करेल, अशी आशा क्रिकेट चाहत्यांना होती. मात्र विराट इथेही फ्लॉप ठरला. विराट ६ धावा करुन आउट झाला. मात्र विराटला आता इंग्लंडविरुद्धच्या एकदिवसीय मालिकेत मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकर याचा रेकॉर्ड ब्रेक करण्याची संधी आहे.

टीम इंडियाने सूर्यकुमार यादव याच्या नेतृत्वात ५ सामन्यांची टी २०ख मालिका ४-१ अशा फरकाने जिंकली. त्यानंतर आता उभयसंघात एकूण ३ सामन्यांची एकदिवसीय मालिका होणार आहे. विराटला या मालिकेत एकदिवसीय क्रिकेटमध्ये १४ हजार धावांचा टप्पा गाठण्याची संधी आहे. आतापर्यंत वनडे क्रिकेटमध्ये सचिन तेंडुलकर आणि कुमार संगकारा या दोघांनाच १४ हजार धावा पूर्ण करता आल्या आहेत.

विराटला वेगवान १४ हजार एकदिवसीय धावा पूर्ण करत सचिनचा रेकॉर्ड ब्रेक करण्याची संधी आहे. विराटच्या नावावर सद्यस्थितीत २९५ एकदिवसीय सामन्यांमधील २८३ डावांमध्ये १३ हजार ९०६ धावांची नोंद आहे. त्यामुळे विराटला आणखी ९४ धावांची गरज आहे. त्यामुळे विराटने ३ सामन्यांमध्ये ९४ धावा केल्या तर तो वेगवान १४ हजार धावा करणारा पहिला फलंदाज ठरेल.

## डबल महाराष्ट्र केसरी चंद्रहार पाटील मानाच्या दोन्ही गदा परत करणार

**अहिल्यानगर । वृत्तसंस्था**

अहिल्यानगरमध्ये २ फेब्रुवारी रोजी महाराष्ट्र केसरी २०२५ स्पर्धा पार पडली. मात्र, या स्पर्धेत उपांत्य आणि अंतिम फेरीत मोठा गोंधळ पाहायला मिळाला. पुण्याचा पैलवान पृथ्वीराज मोहोळ यंदाचा महाराष्ट्र केसरी ठरला आहे. पण पृथ्वीराज मोहोळने उपांत्य फेरीत पैलवान शिवराज राक्षे आणि अंतिम फेरीत पैलवान महेंद्र गायकवाडवर विजयी मात करत मानाची गदा पटकावली. पण या दोन्ही फेरीच्या



सामन्यांमध्ये मोठा वाद निर्माण झाला. तसेच सामन्यानंतर पंचांशी हुज्जत घातल्याप्रकरणी पैलवान शिवराज राक्षे आणि पैलवान महेंद्र गायकवाड यांना कुस्तीगीर परिषदेने तीन वर्षांसाठी निलंबित केलं. दरम्यान, या वादावर प्रतिक्रिया देताना दोन वेळा महाराष्ट्र केसरी झालेल्या चंद्रहार पाटील यांनी मोठी घोषणा केली आहे. मानाच्या दोन्ही गदा परत करणार असल्याचे चंद्रहार पाटील यांनी म्हटले आहे.

### चंद्रहार पाटील काय म्हणाले?

२००७ साली महाराष्ट्र केसरी होत असताना मी सांगली जिल्ह्याला २७ वर्षांनंतर मानाची गदा मिळवून दिली. अनेक वर्ष डबल महाराष्ट्र केसरी कोणीही नव्हतं. पण मला आणि सांगली जिल्ह्याला डबल महाराष्ट्र केसरी होण्याचा मान मिळाला. तसेच तिसऱ्यांदा महाराष्ट्र केसरीसाठी मैदानात उतरणारा पैलवान मी होतो. आता ज्या प्रकारे शिवराज राक्षेवर पंचांनी अन्याय केला, शिवराज राक्षेला ज्या प्रकारे हरवण्यात आलं. त्याच प्रकारे मलाही तिसऱ्यांदा महाराष्ट्र केसरी होत असताना हरवण्यात आलं होतं, असा आरोप आता चंद्रहार पाटील यांनी केला आहे.

## वर्ल्ड चॅम्पियन लेकींचे मायदेशात जंगी स्वागत

**हैदराबाद । वृत्तसंस्था**

मलेशियातील क्वालालंपूर येथे पार पडलेल्या आयसीसी महिला अंडर-१९ टी-२० विश्वचषक स्पर्धेत भारताच्या लेकींनी फायनल बाजी मारली. महिला अंडर १९ संघानं सलग दुसऱ्यांदा क्रिकेट जगतातील मोठी स्पर्धा जिंकून दाखवली. या दैदिप्यमान कामगिरीनंतर बीसीसीआयनं युवा रणरागिनींच्या वर्ल्ड चॅम्पियन संघासाठी ५ कोटी रुपयांचे बक्षीसही जाहीर केले. एकही सामना न गमावता वर्ल्ड कपची ट्रॉफी जिंकली. क्रिकेट जगतात भारतीयांचा



दबदबा दाखवून देणाऱ्या लेकी मायदेशी परतल्या आहेत. भारतीय संघातील सदस्यांचे हैदराबादमध्ये जंगी स्वागत करण्यात आले. अंतिम सामन्यात दक्षिण आफ्रिकेच्या संघाला ९ विकेट्स राखून पराभूत करत भारतीय अंडर १९ महिला संघाने दुसऱ्यांदा टी-२० कप स्पर्धा जिंकली.

भारतीय संघातील द्रिथी केसरी आणि विक्रमी शतकवीर गोंगडी त्रिशा यांनी एएनआयशी संवादही साधला. यावेळी द्रिथी केसरी म्हणाली की, क्रिकेट खेळायला सुरुवात केल्यापासून विराट कोहलीकडून प्रेरणा घेते. माझ्या यशात कुटुंबियांचा सिंहाचा वाटा आहे. या यशाचं श्रेय मी माझ्या आई-वडिलांना देईन, असे ती म्हणाली. स्पर्धा गाजवणारी त्रिशा म्हणाली, मिताली राजला मानते आदर्श भारतीय संघाच्या विजयात सर्वात आघाडीवर असलेला चेहरा म्हणजे गोंगडी त्रिशा.

### विधीलिखित

सुरेशराव बोरकर, ब्रह्मांड ज्योतिष कार्यालय, रावेर. मो. : ९८५००१५५५८

बुधवार, दि. ५ फेब्रुवारी २०२५

***-*-* दैनंदिन राशिभविष्य *-*-***

- **मेष** – स्वत:च्या निर्णय स्वत: घ्याल.
- **वृषभ** – मनात नको ते विचार येतील.
- **मिथुन** – धार्मिक कार्यात अडथळे येतील.
- **कर्क** – कुटूंबाचा विचार अधिक कराल.
- **सिंह** – प्रेम प्रकरणे असतील तर त्यात रमाल.
- **कन्या** – मानसिक चिंता वाढतील.
- **तूळ** – पतिपत्नीत आनंदी वातावरण राहील.
- **वृश्चिक** – नाते संबंध तपासून बघावे.
- **धनू** – मुलांना जसे शिकवाल तसेच वागतील.
- **मकर** – नातेवाईकांचे विचारांचा विचार करावा.
- **कुंभ** – हातून अघटीत घडण्याची संभावना.
- **मीन** – धार्मिक कार्य संपन्न कराल.

## नागपूर वन डे सामन्यापूर्वी टीम इंडियाच्या सदस्याला पोलिसांनी पकडले



**नागपूर । वृत्तसंस्था**

भारत आणि इंग्लंड यांच्यातील वनडे मालिका ६ फेब्रुवारीपासून सुरु होत आहे. या मालिकेतील पहिला सामना नागपूरमध्ये होणार आहे. यासाठी टीम इंडियाचे सर्व सदस्या नागपूरला पोहोचले आहेत. भारताने टी२० मालिकेत इंग्लंडला ४-१ ने पराभूत केलं. त्यामुळे वनडे मालिकेत तशाच कामगिरीची अपेक्षा आहे. टीम इंडियाचा आक्रमक पवित्रा असला तरी यावेळी चेहरे वेगळे आहेत. रोहित शर्माच्या नेतृत्वात टीम इंडिया मैदानात उतरणार आहे. नागपूर वनडे सामन्यात भारताच्या तयारी किती झाली आहे हे दिसून येईल. पण या सामन्यापूर्वीच टीम इंडियाच्या एका सदस्याला नागपूर पोलिसांनी पकडले. त्याला पकडण्याचे कारण असं की तो टीम इंडियाच्या सदस्यांपासून वेगळा होता. हा सदस्य दुसरा तिसरा कोणी नसून भारतीय संघाचा थ्रोडाउन स्पेशालिस्ट रघु होता.

व्हायरल व्हिडीओत एक पोलीस कर्मचारी रघुला अडवताना दिसत आहे. पोलिसांनी तो कोणीतरी चाहता असल्याचे समजून त्याला अडवले. रघु काही मिनिटे पोलिसांना समजवले. थोड्या वेळाने जेव्हा पोलिसांनी त्याचे म्हणणे पटले तेव्हा त्यांनी त्याला सोडून दिले.

रघु हा भारतीय संघासोबत २०११ पासून आहे. रघुने १५० ते १५५ किमी प्रतितास वेगाने चेंडू फेकण्यात माहिर आहे. रघुने या माध्यमातून विराट कोहली, एमएस धोनी, केएल राहुलसारख्या दिग्गज खेळाडूंना तयारी करण्यास मदत केली आहे. त्यामुळे रघुचं संघासोबत असणं खूपच महत्त्वाचं आहे. सामन्यापूर्वी खेळाडू रघुच्या स्पीडचा सामना करतात आणि पुढची तयारी करत असतात. इंग्लंडचा जोफ्रा आर्चर आणि मार्क वूड हे गोलंदाजी १४५ किमी प्रतितासाने चेंडू टाकण्याची ताकद ठेवतात. त्यामुळे या गोलंदाजांना सामना करताना रघुसोबत थ्रोडाऊन सराव खूपच महत्त्वाचा आहे.

## भारताचा स्फोटक फलंदाज अभिषेकच्या डेटिंगची चर्चा



**मुंबई । वृत्तसंस्था**

मुंबईतील वानखेडे स्टेडियमवर इंग्लंडविरुद्धच्या पाचव्या टी-२० सामन्यात भारतीय फलंदाज अभिषेक शर्माने ५४ चेंडूत ७ चौकार आणि १३ षटकारांच्या मदतीने १३५ धावांची स्फोटक खेळी केली.

अभिषेक शर्माने या शतकासह अनेक विक्रम देखील आपल्या नावावर केले. अभिषेक शर्माने ३७ चेंडूत आपले शतक पूर्ण केले, ज्यामुळे तो टीम इंडियासाठी टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये सर्वात जलद शतक करणारा दुसरा फलंदाज बनला.

अभिषेक शर्माच्या या धमाकेदार खेळीनंतर त्याच्या वैयक्तिक आयुष्याबाबतही सध्या सोशल मीडियावर चर्चा होत आहे

एका सुंदर तरुणीला अभिषेक शर्मा सध्या डेट करत आहे. काही दिवसांपूर्वी अभिषेक शर्माबरोबर एक मिस्ट्री गर्ल पाहायला मिळाली होती.

अभिषेक शर्मा मॉडेल लैला फैसलला डेट करत असल्याचे बोलले जात आहे. लैला फैसल ही लग्झरी महिला ब्रँड असलेल्या एलआरएफची फाउंडर आहे.

लैला फैसल ही लग्झरी महिला ब्रँड असलेल्या एलआरएफ ची फाउंडर आहे. अभिषेक आणि लैला यांची भेट झाली आणि त्यानंतर हे दोघे एकमेकांना डेट करत असल्याची जोरदार चर्चा सोशल मीडियावर सुरु आहे.

देशदूत
हे दैनिक मुद्रक व प्रकाशक **राजेंद्र कृष्णराव सोनवणे** यांनी श्रीरंग प्रकाशन प्रा.लि.यांच्याकरिता सकाळ मीडिया प्रा.लि., प्लॉट नं.सी-३, एम.आय.डी.सी.एरिया टेलिफोन एक्सचेंजसमोर, औरंगाबाद रोड, जळगाव-४२५००३ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून देशदूत कार्यालय, अमर चित्र मंदिर चौक, नंदुरबार-४२५४१२ येथे प्रसिध्द केले. ● **व्यवस्थापकीय संपादक : विक्रम सारडा.** ● **संपादक : हेमंत दिनेश अलोने*. फोन नं.**: नंदुरबार-२२११०१, जळगाव शहर कार्यालय-२२२८७८१, २२२४६६०, भुसावळ-२२०६८०, २२४७९५, रावेर-२५०४४४, धुळे-२३७९१४, फॅक्स-२३८९१४. **RNI.No. 69123/1998.** (* पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे.)